# श्रावणबाळ  सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना

**श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेमध्ये दोन गट आहेत.**

**१.श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना गट - अ**

**२.श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना गट - ब**

**१.श्रावणबाळ  सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना गट - अ :-** या गटात ज्या लाभार्थ्याचे वय वर्ष ६५ झाल्यानंतर  पात्र  लाभार्थ्यांना  या श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेत समावून घेतले जाते व त्या पात्र लाभार्थ्यास इंदीरा गांधी राष्ट्रीय  वृध्दपकाळ निवृत्ती वेतन योजनेमधुन अनुदान  र.  रु २००/- व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेतुन  र. रु ४००/- असे एकुण र. रु. ६००/- या योजनेला श्रावणबाळ गट अ म्हणतात.

**२.श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना गट - ब:-** या गटात  जे लाभार्थी दारिद्रय रेषे खालील यादीमध्ये ज्याचा समावेश नाही  परंतु त्यांचे वार्षीक उत्पन्न र. रु २१०००/- पेक्षा कमी आहे अशा पात्र लाभार्थ्यांना राज्य शासनाकडुन र. रु ६००/- देणेत येते त्याला श्रावणबाळ गट ब म्हणतात.

# ५. श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना

या योजनेंतर्गत राज्यातील ६५ व ६५ वर्षावरील निराधार वृध्द व्यक्तींना मासिक निवृत्तीवेतन देण्याच्या मूळ हेतुने श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेन योजना राबविण्यात येते.

**पात्रतेचे निकष :-** कुटूंबाचे नांव ग्रामीण / शहरी भागाच्या दारिद्रय रेषेखालील कुटूंबाच्या यादीत समाविष्ट असावे किंवा कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु. २१,०००/- पर्यंत असावे

**आर्थिक सहाय्य :-** दारिद्र रेषेखालील कुटूंबांच्या यादीतील लाभार्थ्यांना राज्य शासनाकडुन र. रु. ४००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहिना व याच लाभार्थ्यांना केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजनेखालील रुपये २००/- प्रतिमहिना असे एकुण र. रु. ६००/- प्रतिलाभार्थी प्रतिमहिना निवृत्तीवेतन मिळेल

**आवश्यक कागदपत्रे :-**

१. वयाचा दाखला

२.उत्पन्न दाखला

३. रहिवाशी दाखला